मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**मराठी भाषा विभाग**

**राज्य मराठी विकास संस्था**

**एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,**

धोबीतलाव, मुंबई – ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६

संकेतस्थळ **https://rmvs.marathi.gov.in**

इ-पत्ता **project3.rmvs@gmail.com/ mks2223.rmvs3@gmail.com**

## “महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भागातील मराठी भाषा संस्कृती व विकास यासाठी अर्थसाहाय्य योजना” - सन २०२२-२३

महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भागातील, महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गावांतील मराठी भाषेचा विकास, संवर्धन, संगोपन आणि अभिवृद्धी होण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाच्या राज्य मराठी विकास संस्थेतर्फे महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भागातील मराठी मंडळे/संस्थांना अर्थसाहाय्य करण्यात येणार आहे.

सदर सोबत ८६५ गावांची यादी असलेला दि. १० जुलै २००८ रोजीचा शासन निर्णय राज्य मराठी विकास संस्थेच्या https://rmvs.marathi.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला असून त्याचा दुवा (लिंक) https://rmvs.marathi.gov.in/2956 असा आहे.

राज्य मराठी विकास संस्थेने या योजनेअंतर्गत, निश्चित केलेल्या विहित कार्यपद्धती व निकषांना अनुसरून महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भागातील मराठी भाषा, साहित्य व संस्कृती वृद्धिंगत होण्यासाठी कार्य करणाऱ्या मान्यताप्राप्त संस्थांना/ मंडळांना अनुदान सहाय्य करण्यात येणार आहे. निवड झालेल्या प्रत्येक मंडळाला/संस्थेला रु. १०.०० लक्षच्या कमाल मर्यादेत अनुदान सहाय्य करण्यात येणार आहे.

**या याजनेंतर्गत सन २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी दिनांक ०१/०१/ २०२३ ते ३१/०१/२०२३ या कालावधीत, विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. या योजनेची कार्यपद्धती व निकष, मार्गदर्शक सूचना, विहित अर्जाचा नमुना इतर तपशील राज्य मराठी विकास संस्थेच्या** https://rmvs.marathi.gov.in या तसेच महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या अधिकृत संकेतस्थळावर **‘“महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भागातील मराठी भाषा संस्कृती व विकास यासाठी अर्थसाहाय्य योजना”** या शीर्षकाखाली उपलब्ध करून देण्यात आले आहेत. पूर्णपणे भरलेले अर्ज दिनांक ३१ /०१/ २०२३ पर्यंत संस्थेस इ-पत्त्याद्वारे तसेच उपरोक्त पत्त्यावर टपालाद्वारे प्राप्त व्हावेत. **तसेच पूर्ण भरलेला अर्ज व संबंधित जोडपत्रे स्कॅन करून mks2223.rmvs3@gmail.com या इ पत्त्यांवर इ-टपालाद्वारे (इ मेल) विहित कालमर्यादेत पाठवावा. कालमर्यादेनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.**

**विशेष सूचना** - महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भागातील, महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गावांव्यतिरिक्त गावांतील मराठी भाषेचा विकास, संवर्धन, संगोपन आणि अभिवृद्धी होण्याच्या दृष्टीने कार्यरत असणाऱ्या संस्था / मंडळे यांनी राज्य मराठी विकास संस्था राबवित असलेल्या **‘बृहन्महाराष्ट्र मंडळे अर्थसाहाय्य योजना’** या स्वतंत्र योजने अंतर्गत विहित केलेल्या कार्यपद्धतीस अनुसरून अर्ज करावा.

संचालक

राज्य मराठी विकास संस्था